Historicity Research Journal
Volume 2 | Issue 4 | Dec 2015

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# असहकार चळवळीत धरणगावच्या (जळगाव) जनसामान्यांचा सहभाग

**दिनेश रामदास महाजन**

इतिहास विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद,
ता.यावल जि.जळगाव (महाराष्ट्र)

## प्रास्तविक :-

धरणगाव (२०° ५५`उ., ७५° १०`पू., नगरपालिका स्थापन १८६६) हे भुसावळ सुरत रेल्वे मार्गावरील स्थानक जळगावच्या पश्चिमेस ३२ कि.मी. आहे. हे महत्वाचे व्यापारी केंद्र असून कपाशीचे प्रारंभिक प्रयोग येथेच झालेत.जिल्हयातील कापूस जिनिंग प्रेसिंग कारखान्याच्या स्थापनेस प्रथम प्रयोगही येथेच झाला.हातमाग विणकरांचे केंद्र म्हणूनहीते प्रसिध्द आहे.पूर्वी येथेहातकागदहीतयारहोत असे.

१६०१ मध्ये मुघलांनी धरणगाव हस्तगत केले तेव्हा ते `सिरीसाफ` व `भिरौन` कापडाबाबत प्रसिध्द होते असे अबुल फसलने ऐन-ए-अकबरी मध्ये लिहून ठेवले आहे.१७ व्या शतकात या गावाचा उल्लेख डाँगाँग, दोरोणगाव व द्रोणगाव अशा नावांनी फार महत्वाचे व्यापारी ठिकाण म्हणून केल्याचा आढळतो.१६७४ मध्ये ब्रिटीशांनी येथे वखार स्थापन केली.शिवाजी महाराजांनीती १६७५ आणि १६७९ मध्ये दोनदा लुटली.१६८५ मध्ये संभाजीनेही हे शहर लुटले व आगी लावून बेचिराख केले.१६७५ मध्ये शिवाजी महाराजांनी खानदेशचा मुघल सुभेदार बहादुरखानवर हल्ला करुन धरणगाव लुटतांना इंग्रजांची वखारही लुटलीहोती.या लुटीची नुकसान भरपाई मिळण्यास्तव नजराणा घेऊन गेलेला इंग्रज वकिलसॅम्युअल ऑस्टिन ७ सप्टेंबर १६७५ रोजी शिवाजी महाराजांना रायगडावर भेटला.परंतु महाराजांनी वखार लुटीची भरपाई देण्याचे मान्य केले नाही.मराठासैन्याने १६७५ मध्ये धरणागाव लुटले त्यावेळी मुघलठाणेदार कुतूबुद्दीन याने प्रखर विरोध केला.परंतु त्याचा उपयोग झाला नाही.१८१८ मध्ये ब्रिटीश सत्ता आल्यावर ते पुन्हा भरभराटीस आले.गावात मध्यभागी एक पिरान दस्तगीर नामक दर्गा आहे.तो औरंगजेबाने बांधला असे सांगतात.रेल्वे स्थानकाजवळच भिल्लांचा पुढारी खाजा नाईक याचेस्मारक आहे.ब्रिटीशांनी त्यास फासावर चढविले होते.गावात सुमारे ३२५ वर्षापूर्वीचे पाताळेश्वर मंदिर आहे.येथील `शुभकरण` नामक वाचनालय जुने व प्रसिध्द आहे.गावात लहान मोठया १४ मशिदी आणि पाच दर्गे आहेत.धरणगावला पश्चिम बाजूस कब्रस्थान असून त्यात अनेक उध्वस्त कबरी आहेत. या कबरी धरणगावला वखार केलेल्या मृत ब्रिटीश व्यक्तींच्या आहेत असे सांगतात.[१]

धरणगाव या गावात शिरताच`बिबितलाव` नावाचे तळे लागते.रेल्वे स्टेशन.१६०० च्या सुमारास व्यापारी शहर म्हणून प्रसिध्द होते.`जिरोफाफ` व `भिरण` या कापडाकरिता याची फार प्रसिध्दीहोती.१६७४ मध्ये इंग्रजांनी आपली वखार येथे स्थापन केली.काही काळहेगाव मराठयांच्या ताब्यात होते.१८१८ साली ब्रिटीशांच्या ताब्यात आले.ठग-पेढाऱ्यांचा उपद्रव मोडण्यासाठी इंग्रज अधिकाऱ्यांनी बरेच प्रयत्न केले. मेजर औटरॅम याने येथे १८३० मध्ये भिल्ल पलटणी उभ्या केल्या व सर्वदूर शांतता प्रस्थापित केली.मेजर औटरॅमच्या निवासस्थानाचे उवशेष येथे आजही दिसतात.येथे कापूस, शेंगा व लाकूड याचा मोठा व्यापार होता.येथीलहातमागाचे कापड प्रसिध्द होते.येथे जवळपास १००० हातमाग होते.[२]धरणगाव येथे १८६६ साली म्युनिसिपालिटीची स्थापना करण्यात आली.धरणगावचे क्षेत्रफळ १.८५ चौ.मैल आहे.[३]

बंगालच्या फाळणीनंतर धरणगाव येथेही स्वदेशीचा प्रचार-प्रसार झालेला दिसतो.यानिमित्तानेमनोहर गोविंद अभ्यंकर यांनी डिसें.१९०५ मध्ये धरणगाव, अमळनेर, पारोळा येथे स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविले.त्या प्रदर्शनात स्वदेशी कापड, चाकू, साबण, सतरंज्या

इ.वस्तू ठेवल्या होत्या.तसेचधरणगाव येथे १४ जानेवारी १९०६ रोजी`स्वदेशी` वर सभा झाली. सभेत शिरपूरचे रहिवासी व धरणगाव येथे बांधकाम खात्यात काम करणारे रामचंद्रश्रीधर गंधे, कृष्णा काशिनाथ करमरकर व गोविंद महादेव फडके यांची स्वदेशीवर व्याख्याने झ ााली.[४]

एवढेच नव्हे तरधरणगावचे कन्हैय्यालाल व शेंदुर्णीचे वाजपेयी या दोघा क्रांतीकारक तरुणांनी बंगालच्या फाडणीवेळी सरकारने जी दडपशाही करुन अमानुष अत्याचार केले त्याचा प्रतिकार दहशतवादी कृत्यांनी केला. अभिनव भारत या चळवळीत तेहोते.कलकत्तता बॉम्ब फेकमध्येत्यांनी भाग घेतला आणि त्यात त्यांना फाशीची शिक्षा झाली.हे डगमगले नाहीत.ते धैर्यवान क्रांतीकारक आनंदाने अगदीहसत मुखाने फासावर चढले (१९०७)जळगाव जिल्हयाचेते पहिले थोरहुतात्मा होत.[५]

चितांमण दिनकर बोडस व नरहर कृष्ण भावे या दोघांनी धरणगाव येथे १९०८ मध्ये राष्ट्रीय शाळा सुरु केली.विद्यार्थ्यांकडून फि घेतली जात नसे.मुष्टीफंड गोळा केला जाई व त्याद्वारे शाळेचा खर्च भागाविला जात असे. इतर विषयांच्या शिक्षणाखेरीज व्यायामविषयक शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाई. दर रविवारी विद्यार्थ्यासमोर धार्मिक विषयावर व्याख्यान दिले जाई.बनारसचे एक सन्यांसी सच्चिदानंद भास्कर यांचे २२ ते २५ मे १९०८ पर्यंत धरणगाव येथे`मद्यपान निषेध`, `विदेशी वस्तु` व `साक्षरता` यावर व्याख्यान झाले.[६]

लोकमान्य टिळकांच्या होमरुल चळवळीलाही धरणगाव येथे मोठा पाठींबा मिळाला.९ नोव्हेंबर १९१७ रोजीधरणगाव येथे `होमरुल` या विषयावर पुण्याचेहरिहरसदाशिव पटवर्धन यांचे व्याख्यान झाले.एरंडोलचे पाठक वकील व काळकर यांचीही याप्रसंगी भाषणे झाली.[७]लोकमान्य टिळक स्वराज्य संघाच्या प्रचारार्थ दौऱ्यावर असतांना धरणगाव येथे१ डिसेंबर १९१७ रोजी आले.त्याचवेळी लोकमान्य टिळक व जी.एस.खापर्डे यांची भाषणे झाली.[८]

१९२० मध्ये महात्मा गांधींनी सत्य व अहिंसेवर आधारीत असहकार चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेतला.महात्मा गांधींच्या आवाहनाप्रमाणे हजारो विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालयावर बहिष्कार टाकुन आपले सर्वस्व अर्पण केले.परदेशी मालावर बहिष्कार घालुन गावागावात परदेशी मालाच्या होळया पेटविण्यात आल्या.याशिवाय स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे, खादीचा प्रसार करणे, अस्पृश्यता निवारण, हिंदू-मुस्लीम ऐक्य, दारुबंदीचा प्रचार करणे अशी महत्वाची कामगिरी या चळवळीने पार पाडली.धरणगावातूनही महात्मा गांधींच्या असहकार चळवळीला उत्स्फुर्त पाठींबा मिळाला.धरणगावच्या जनसामान्यांनीमहात्मा गांधींच्या मार्गाचा अवलंब करुन या चळवळीला पाठबळ दिले.

महात्मा गांधींचा असहकारितेचासंदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी धरणगाव येथे १४ नोव्हेंबर १९२० रोजी पाठक वकील यांचे अध्यक्षतेखाली अण्णासाहेब वा.वि.दास्ताने यांचे व्याख्यान झाले.चिमणराव यांचेही यावेळी आवेशयुक्त भाषणझाले.यासभेकरिता एरंडोलहून ठोंबर आणि काही कार्यकर्ते आलेलेहोते.[९]

असहकार चळवळीचा एक भाग म्हणून महात्मा गांधींनीएक कोटी टिळक स्वराज्य फंड गोळा करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यासाठी देशभरात फंड गोळा करण्यात येतहोता.परंतु त्यात काही गैरप्रकारही झाले.अमरावतीचे फडके नावाचे एक गृहस्थ टिळक फंड गोळा करण्यासाठी जळगाव जिल्हयातील धरणगाव, एरंडोल, पारोळा, चाळीसगाव इ.गावात फंड गोळा केला.परंतु फंडातील काही पैसेत्यांनी आपल्या मातोश्रींना पाठविल्याचे उघड झाले.तेव्हा जिल्हा कॉंग्रेसने एक पत्रक काढून लोकांना आवाहन केले कि, फंड गोळा करणाऱ्या व्यक्तीबद्दल खात्री झाल्याशिवाय फंड देऊनये.तसेच गावा गावातील लोकांनी टिळक फंड गोळा करण्यासाठी मदत करावी.तसेच पावतीशिवाय कोणालाही फंड अगर वर्गणी देऊ नये.[१०] असे जिल्हा कॉंग्रेसने आवाहन केलेले दिसते.

महाराष्ट्रात महात्मा गांधींचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी व असहकार चळवळीचा प्रसार करण्यासाठी पुण्याचे शंकरराव देव यांनी पूर्वखानदेशात ऑगस्ट १९२१ मध्ये व्याख्यानाचा दौरा काढलाहोता.त्यांची धरणगाव व एरंडोल येथेवा.वि.दास्ताने यांच्या अध्यक्षतेखाली सुश्राव्य व परिणामकारक अशीव्याख्याने झाली.धरणगावच्या व्याख्यायनावेळी एका मुलाने एरंडोलच्या जोशी वकीलाने कोट जाळून टाकावा असे सुचविले.ही बालवाणी एकुन जोशी वकीलांचा चेहरा एकदम कावरा बावरा झाला व संतापात ते बरळूलागले.हया क्रोधातते महात्मा गांधी यांना दोष देऊ लागले.व ही गांधीजींची आज्ञा बालीशपणाची आहे असे म्हणू लागले.[११]

१९२१ मध्ये कॉंग्रेसने खिलाफतकमिटीचीमोहीम देशभरात सुरु केलीहोती.त्यात जळगाव जिल्हा मुसलमानांमध्ये वासुदेव दास्ताने यांनी मोठे कार्य केले.त्यांनीधरणगाव, नशिराबाद, चोपडे, पारोळे, अमळनेर, यावल व भुसावळ याठिकाणी हिंदू-मुसलमानांमधील ऐक्याच्या दृष्टीने अनेक सभा घेतल्या.[१२]

देवकीनंदन नारायण असहकार चळवळीच्या प्रचार-प्रसाराचे कार्य करीत असताना ऑक्टोबर १९२१ मध्ये धरणगावला त्यांची असहकार चळवळीसंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी जाहीर सभा झाली.त्यांच्या भाषणाने तेथील जनता एवढी प्रभावीत झाली की देवकीनंदन नारायण चक्रवर्ती यांचे भाषण झाल्यावर श्रोत्यांनी उभे राहून त्यांना अभिवादन केले.[१३]हा त्यांच्या प्रभावी भाषणाचा परिणामहोता.

महात्मा गांधींच्या कायदेमंडळ बहिष्काराच्या विरोधात स्वराज्य पक्षाने कायदेमंडळाच्य निवडणुका लढविण्याचे ठरविले. स्वराज्य पक्षाच्या महाराष्ट्र प्रांतिक शाखेचे अध्यक्ष नरसोपंतकेळकर नागपुरहून पुण्याला परत जाताना जळगावच्या स्वराज्य पक्षाच्या मंडळीच्या विनंतीवरून केळकर १३ व १४ जुलै १९२३ रोजी जळगाव येथे मुक्कामालाहोते.जळगाव जिल्हयात स्वराज्याचा कार्यक्रम जिल्ह्यातर्फे कौन्सीलनिवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवाराची नावे सर्वांच्या संमतीने निश्चित करण्याचे महत्वाचे काम केळकरांना करावयाचे होते.त्याकरिताधरणगव, भुसावळ,चाळीसगाव, एरंडोल, अमळनेर, इ.ठिकाणी स्थापना झालेल्या स्वराज्य पक्षाच्या शाखांच्या अध्यक्षांना व महत्वाच्या पुढाऱ्यांना बोलविण्यात आलेहोते.केळकर यांच्यासोबत मराठा पत्राचेसंपादक बाबूराव गोखलेहेही असल्यामुळेत्यांचाही सल्ला उपयोगी पडला.

ठरल्याप्रमाणे शुक्रवार १३ जुलै१९२३ रोजी रात्रीहरी विष्णू कोल्हटकर वकील यांच्या बंगल्यात स्वराज्य पक्षाचे सभासद व स्वराज पक्षाच्या कार्यक्रमाशी सहानुभूती आलेल्या सद्गृहस्थाची एक बैठक भरविण्यात आलीहोती. या बैठकीला धरणगावचे के.एल.जोशी, अमळनेरचे भाऊसाहेब परांजपे , चाळीसगावचे घाटे, हरिभाऊ पाटसकर,एरंडोलचे पी.जी. जोशी, दत्तात्रय वामन काळसकर, अण्णा देशपांडेहे उपस्थित होते.या बैठकीला जळगावचे बहुतेक प्रमुख सभासद हजरहोते.प्रांतिक स्वराज पक्षांची सभा पुणे येथे १० जून१९२३ रोजी भरून प्रांतिक काँग्रेसनेजळगव जिल्हयाकरीता पी.जी.जोशी व हरिभाऊपाटसकर या दोन उमेदवारांची नावे निश्चित केलीहोती.तसेच१२ जून १९२३ च्या केसरीत प्रसिध्द करण्यात आलीहोती.परंतु या बाबतीत कोणाच्या आणखी काहीसूचना असल्यास त्यांचाही विचार व्हावा.तसेचजळगावद जिल्हयास मिळालेल्या तीन जागांपैकीतीनही ठिकाणी उमेदवार उभे करावे किंवा सोयीसाठी दोनच उमेदवार उभे करावे हा एक प्रश्न होता.तसेच ब्राम्हणेतर उमेदवार मिळाल्यास पहावे असा ही एक विचार होता. परंतु स्वराज्य पक्षाच्या सभासदांना पी.जी.जोशी व हरिभाऊ पाटसकरयांच्याशिवाय दुसरा कोणी उमेदवार स्वराज्य पक्षातर्फे उभे करण्याविषयी सूचना करावयाच्या असतीलतर त्या सर्व सूचनांचा व बाबींचा त्या बैठकीत विचार करण्यात येणारहोता.नरसोपंत केळकर व बाबूराव गोखले जळगावला आल्यावर त्यांना जाहीर व्याख्याने देण्याविषयी पुष्कळ आग्रह करण्यात आला.मात्र स्वराज्य पक्षाच्या कामाच्या दृष्टीने व्याख्यांनापेक्षा खाजगी संभाषणातच कार्य अधिकचांगलेहोऊशकते.तसेच स्वराज पक्षाचे काम बैठक भरवून करा असेनरसोपंतकेळकरांनी सांगितल्यामुळे बैठक बोलविण्यात आलीहोती.[१४]

**निष्कर्ष :**

धरणगाव हे ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले जळगाव जिल्हयातील एक महत्वाचे गाव. या गावाने लोकमान्य टिळकांच्या होमरुल लिग चळवळीला भरभरुन पाठींबा दिला. आणि म्हणूनच लोकमान्य टिळकांनी धरणगावला भेट देऊन येथील लोकांना होमरुल चळवळीसंबंधी तसेच स्वातंत्र्य लढयाविषयी मार्गदर्शन केलेले दिसून येते. तसा महात्मा गांधींच्या असहकार चळवळीलाही या गावातून चांगला प्रतिसाद मिळाला. असहकार चळवळीच्या प्रचारासाठी जिल्हयातील काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष वा.वि.दास्ताने व सेक्रेटरी देवकीनंदन नारायण चक्रवर्ती यांनी धरणगावला वेळीवेळी भेटी देऊन येथील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करुन लोकांना स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रोत्साहित केलेले दिसून येते.

१ चौधरी कि.का. (संपादक), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, जळगाव जिल्हा, मुंबई, १९९४, पृ.७७२
२ भनसाळी डी.एम.(संपादक), संयुक्त खानदेश डिरेक्टरी,मुंबई, १९५२, पृ.३६
३पूर्वोक्त, पृ.५७
४पांडे मधुकर निळकंठ, खानदेशातील स्वातंत्र्य लढा (१८८६-१९४७), अप्रकाशित पीएच.डी., प्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९८६, पृ.११२
५महाजन जे.टी., रौप्य महोत्सवी स्मरणिका, जळगाव, १९७२, पृ.१७२
६पांडे मधुकर निळकंठ, खानदेशातील स्वातंत्र्य लढा (१८८६-१९४७), अप्रकाशित पीएच.डी., प्रबंध, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९८६, पृ.१२५
७पूर्वोक्त, पृ.२०९
८पूर्वोक्त, पृ.२११
९सा.प्रागतिक, जळगाव, २२ नोव्हेंबर १९२०, पृ.०३
१०पूर्वोक्त, १८ एप्रिल १९२१, पृ.०५

११सा.प्रबोधचंद्रिका, जळगाव, २९ ऑगस्ट १९२१, पृ.०५
१२दास्ताने दत्तोबा, एका मुक सेवकाचे समर्पित जीवन, जळगाव, १९७५, पृ.१८४
१३सा.प्रागतिक, जळगाव, २५ आक्टोंबर १९२१, पृ.०२
१४ पूर्वोक्त, १६ जुलै१९२३, पृ.०२